ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ पुणें, बुधवार तारीख २१ फेब्रुवारी, १९६२ अंक ४

बँक ऑफ महाराष्ट्राची

## रिकरिंग डिपॉझिट स्कीम

४ टक्के व्याजाची नवीन योजना


सोपी व अधिक फायद्याची

तुम्हांला शिल्लक टाकणें सोपें जावें व व्याजही भरपूर मिळावें अशी एक योजना महाराष्ट्र बँकेनें तयार केली आहे. **रिकरिंग डिपॉझिट स्कीम**—या खात्यांत आपण दरमहा रु.१०/-अगर १०च्या पटींत ५०० रुपयांपर्यंत कितीहि रक्कम २ वर्षे भरावयाची. दुसऱ्या वर्षाच्या शेवटीं आपल्या खात्यावर ४ टक्के व्याजानें मोठी रक्कम जमा झालेली दिसेल.

दरमहा जी रक्कम आपण ठरवूं तेवढीच नियमितपणें २ वर्षे टाकावयाची. उदा. रु. १०/- महिना रिकरिंग डिपॉझिट खात्यांत टाकले तर २ वर्षांच्या शेवटीं आपणांस रु. २५०/- मिळतील. या बचतीचा उपयोग आपल्याला कितीतरी चांगल्या गोष्टींसाठीं करितां येईल.

तुमचे पैसे कसे वाढतात तें पहा

| मासिक बचत | २४ महिन्यानंतर मिळणारी रक्कम |
|---|---|
| १० | २५० |
| २० | ५०० |
| ३० | ७५० |
| ४० | १,००० |
| ५० | १,२५० |
| ६० | १,५०० |
| १०० | २,५०० |
| २०० | ५,००० |
| ३०० | ७,५०० |
| ४०० | १०,००० |
| ५०० | १२,५०० |





मोफत माहिती पत्रकासाठीं लिहा अगर बँकेच्या शाखेंत येऊन भेटा.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें-२

Pratibha-62-3

# विविध माहिती

**सार्वत्रिक निवडणुकीचा खर्च**—भारतामधील तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या कामासाठी ५·५० कोटी रुपये खर्च येईल, असा अंदाज मुख्य निवडणूक कमिशनर श्री. सुंदरम् ह्यांनीं केला आहे. त्यापैकीं ३ कोटी रुपये मध्यवर्ती सरकार देईल व बाकीचा राज्य सरकारें सोसतील. ह्या निवडणुकींत उभे राहणाऱ्या उमेदवारांची संख्या खूप मोठी असल्यामुळें खर्चांत वाढ झालेली आहे. लोकसभेसाठीं १,९७९ व राज्य विधान सभांसाठीं १२,६२५ उमेदवार उभे आहेत.

**साखरेची अधिक निर्यात** — साखरेच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंतील भाव अलीकडे तेजीकडे झुकल्यामुळें भारतामधून अधिक साखर निर्यात करण्याची शक्यता वाढली आहे, अशी माहिती इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. कनोरिया ह्यांनीं जाहीर केली आहे. भारताच्या साखरेबद्दल अनेक देशांकडून विचारणा होत आहे. त्यांत मलाया, कॅनडा आणि पाकिस्तान हे देश आहेत.

**घरें बांधण्यासाठीं कर्जे**—भारत सरकारच्या घरें व पुरवठा खात्यानें १९६१-६२ सालांत घरें बांधण्यासाठीं ४ कोटी रुपयांचीं कर्जे राज्य सरकारांना देण्यासाठीं मंजूर केलीं आहेत. ह्या रकमेचें वाटप १४ राज्यांतून व्हावयाचें असून त्यांत महाराष्ट्राचा वांटा ७५ लाख रुपयांचा आहे. दरसाल ६,००० ते १५,००० रुपये उत्पन्न असणाऱ्यांना घरबांधणीचीं कर्जे देण्यांत येणार आहेत.

**धातूंच्या उत्पादनांत लागणारा कोळसा**—धातूंच्या उत्पादनाच्या कामीं वापरण्यांत येणारा कोळसा काटकसरीनें वापरावा, अशी सूचना कोलंबो मदत योजनेप्रमाणें भारतांत आलेल्या ब्रिटिश तज्ज्ञांनीं केली आहे. हा कोळसा रेल्वे एंजिनांना लागणाऱ्या जळणासाठीं पुरविण्यांत येत असे. हा कोळसा काढणाऱ्या ३०० खाणी खाजगी मालकीच्या आहेत. फक्त एकच सार्वजनिक मालकीची आहे.

**दक्षिण भारतांत तेलाचा शोध**—दक्षिण भारतांत कावेरी नदीच्या खोऱ्यांत खनिज तेलाचा शोध करण्याचें काम चालूं आहे. ह्या शोधाच्या कामीं अमेरिकन तज्ज्ञांकडून आस्था दाखविण्यांत येत आहे. आणखीहि एका परदेशाकडून शोधाच्या कामीं मदत देण्याची तयारी दाखविण्यांत आली आहे. परदेशीय तज्ज्ञांना भारत सरकारकडून चांगल्या सवलती देण्यांत येतात.

**गोव्यांत मोटारचे वर्कशॉप** — मोटारींना लागणारे सुटे भाग तयार करण्याचा व मोटारींची दुरुस्ती करण्याचा कारखाना काढण्याची परवानगी गोव्याच्या लष्करी राजवटीकडे मागण्यांत आली आहे. संकल्पित कारखाना केपें तालुक्यांत काढण्यांत येण्याचा संभव आहे. आतापर्यंत मोटारींना लागणारे सुटे भाग परदेशांतून आयात करण्यांत येत असत.

**गोव्यांतील मच्छीमारीचा धंदा**—गोव्यामधील मच्छीमारीच्या धंद्याच्या विकासयोजनेची पाहणी करण्यासाठी भारत सरकारचें एक तज्ज्ञ-मंडळ पंजीमला गेलें होतें. हें मंडळ आपला अहवाल लवकरच सरकारला सादर करील. गोव्यांत खाणी व्यवसायाच्या खालोखाल मच्छीमारीचा व्यवसाय महत्त्वाचा आहे. ह्या धंद्याच्या विकासासाठी संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेतकी उपसंघटनेनें पोर्तुगालला १० हजार डॉलर्स दिले होते. परंतु त्यांचा उपयोग करण्यांत आलेला नाहीं.

**संयुक्त-राष्ट्र-संघटनेचे रोखे**— संयुक्त-राष्ट्र-संघटनेतर्फे विक्रीला काढण्यांत यावयाच्या बाँडसपैकीं २० लाख डॉलर्स किंमतीचे बाँडस विकत घेण्याचें भारत-सरकारनें ठरविलें आहे. भारताकडून संघटनेला देण्यांत येणाऱ्या वर्गणीशीं ह्याचा कांहीं संबंध नाहीं. संघटनेला पाठिंबा दाखविण्याचा तो एक मार्ग आहे.

**क्युबाविरुद्ध व्यापारी युद्ध** — क्यूबा देशांत कम्युनिस्ट मतप्रणालीची राजवट आल्यापासून अमेरिकेचे व क्यूबाचे संबंध बिघडत चालले आहेत. क्यूबाकडून साखर आयात करण्यास अमेरिकेनें बंदी घातलेली आहेच. आतां अमेरिकेनें क्यूबाकडून सर्वच आयात बंद केली आहे. ब्रिटन व इतर दोस्तराष्ट्रें ह्यांनींहि क्यूबाबरोबरचा व्यापार कमी करावा म्हणून अमेरिकेचे प्रयत्न चालू आहेत.

**कोळशापासून गॅसचा कारखाना**— धनबादजवळील मध्यवर्ती जळण संशोधन संस्थेनें कोळशापासून गॅस तयार करण्याचा एक प्रायोगिक कारखाना स्थापन केला आहे. भारतांत अशा प्रकारचा हा पहिलाच कारखाना असून, त्यासाठीं लागणारी यंत्रसामग्री अमेरिकेकडून तांत्रिक साह्याच्या योजनेप्रमाणें देणगी म्हणून मिळालेली आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं ३५ लाख रुपये लागले.

**भयप्रद भविष्यकथनाचा परिणाम**—फेब्रुवारी १९६२ च्या ३ तारखेपासून अष्टग्रह मकरराशींत आले. त्याचा परिणाम म्हणून उत्पात होतील अशीं भविष्यें वर्तविण्यांत आलीं होतीं. गुजरात व सौराष्ट्र ह्यांमधून येणाऱ्या हवाई प्रवाशांची संख्या त्यामुळें विशेष रोडावली होती. परदेशांतून येणाऱ्या प्रवाशांच्या संख्येवर मात्र कांहीं परिणाम झाला नाहीं.

**पुणें-मिरज लोहमार्ग** — पुणें ते मिरज हा रेल्वेमार्ग सध्या अरुंद रुळाचा आहे. तो रुंद रुळाचा करण्याचा विचार चालू आहे, अशी माहिती रेल्वेखात्याचे उपमंत्री श्री. रामस्वामी ह्यांनीं सांगितली. हा बदल करण्यासाठीं रेल्वेखात्याला १२ कोटी रुपये खर्च करावे लागतील. त्याचप्रमाणें कांडला ते सुरेंद्रनगर रेल्वेमार्गहि रुंद रुळाचा करण्याचें घाटत आहे.

**भारतामधील तेलपदार्थांची विक्री**—नूनमती येथील तेलशुद्धीच्या कारखान्यांत उत्पादनाला प्रारंभ झाला असून, भारतामधील अशुद्ध तेलापासून निर्माण केलेल्या पेट्रोलजन्य पदार्थांच्या विक्रीला आसाम, प. बंगाल, बिहार व उत्तरप्रदेश ह्या चार राज्यांतून प्रारंभ झाला आहे. हा तेलशुद्धीचा कारखाना सरकारी मालकीचा आहे. सध्या हलक्या डिझेल तेलाची निर्मिति करण्यांत येत आहे.

**तैलचित्रांच्या विक्रीचें कारण**—सुप्रसिद्ध ब्रिटिश ग्रंथकार मि. सॉमरसेट मॉम ह्यांनीं आपल्याजवळील चित्रसंग्रहापैकीं ३५ विख्यात तैलचित्रें विक्रीला काढलीं आहेत. मि. मॉम हे धनाढ्य आहेत. परंतु आपल्या चित्रांची चोरी होईल, अशी भीति त्यांना वाटत आहे. विक्रीस काढलेल्या चित्रांची किंमत सुमारें ७ लाख पौंड आहे.

**राजकीय पक्षांना देणग्या**—कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशनचे चिटणीस श्री. मुझुमदार ह्यांनी असें मत व्यक्त केलें आहे कीं, भागीदारांच्या संमतिशिवाय अगर कंपनीच्या आर्टिकल्समध्यें तशी तरतूद असल्याशिवाय कंपन्यांनीं राजकीय पक्षांना देणग्या देणें बेकायदा आहे. ते चार्टर्ड अकौंटंटसच्या एका सभेंत भाषण करीत होते.

# अर्थ

बुधवार, ता. २१ फेब्रुवारी, १९६२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची परदेशीय मदत

भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमावर कधीं कधीं अशी टीका करण्यांत येते कीं, तो फार महत्त्वाकांक्षी आणि देशाच्या आर्थिक कुवतींच्या मर्यादेपलीकडील आहे. ह्याचा अर्थ असा कीं, ह्या कार्यक्रमांत साधावयाची औद्योगिक प्रगति भारताला आपल्या स्वतःच्या बळावर साध्य करतां येण्यासारखी नसल्यानें त्याला अनिर्वाह्यपणें परदेशी मदतीवर अवलंबून राहावें लागणार आहे. परदेशीय मदतीची शाश्वति धरतां येत नसल्यानें पंचवार्षिक कार्यक्रमाचें यशहि अनिश्चितच राहणार, असा हा युक्तिवाद आहे. परंतु ह्या विषयासंबंधीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. अय्यंगार ह्यांनीं जे विचार व्यक्त केले आहेत ते आशादायक आहेत. बंगलोर येथील किर्लोस्कर इलेक्ट्रिक कंपनीच्या विस्तारयोजनेचे उद्घाटन करतांना ते म्हणाले कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठीं लागणाऱ्या खर्चात २,५०० कोटी रुपयांच्या परदेशी चलनाची तूट पडणार आहे. परंतु ही तूट भरून निघेल याबद्दल शंका वाटण्याचें कारण नाहीं. भारताला जी परदेशीय मदत मिळत आहे ती तात्कालिक हेतूनें देण्यांत येत नाहीं. आशिआंतील भारताचें स्थान आणि मैत्रीची भावना ह्यांच्यामुळें ती देण्यांत येत आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या खर्चात ८०० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची तूट पडेल अशा शंका व्यक्त करण्यांत आल्या होत्या. परंतु प्रत्यक्षांत त्या खऱ्या ठरल्या नाहींत. उलट, भारताला त्या रकमेपेक्षा दुपटीनें अधिक इतकी परदेशीय मदत उपलब्ध झाली. कांहीं लोक तिसऱ्या योजनेची व्याप्ति कमी करावी अशा सूचना करीत आहेत. परदेशीय चलनाबाबत आणि औद्योगिक कच्च्या मालाबद्दल अडचणी असल्यामुळें ह्या सूचना करण्यांत येत आहेत. पण, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची व्याप्ति कमी करण्यांत आली तर ती एक दुःखकारक चूक होईल. देशाच्या गरजांचा विचार करतां हा कार्यक्रम फार मोठा आहे असें म्हणतां येत नाही.

भारतांत सध्या अवजड कारखान्यांच्या उभारणीवर जोर देण्यांत येत आहे, आणि तो बरोबरहि आहे. परंतु ह्या नादांत चालू कारखाने चालू ठेवण्याच्या कामीं हयगय होण्याचा संभव आहे. हा खरोखर एक कूट प्रश्नच आहे. अवजड कारखान्यांच्या उभारणीवर ज्या मानानें खर्च करण्यांत येईल. त्या मानानें चालू कारखाने कार्यक्षम राखण्यास पैसा कमी पडूं लागतो. हा प्रश्न सोडविण्याचे दोन मार्ग सांगतां येतील सरकारी यंत्रणा आणि जागतिक बँकेसारख्या संस्था, ह्यांनीं सध्याचें औद्योगिक उत्पादन चालू ठेवण्यासाठी म्हणून वेगळी मदत द्यावी, हा पहिला मार्ग; दुसरा म्हणजे निर्यात वाढविण्याचा. सध्यां भारताला जी परदेशीय मदत मिळत आहे, त्यापैकी बराच मोठा भाग परदेशांतून भारी यंत्रसामग्री आयात करण्यासाठी खर्च केला जातो. परदेशीय मदत कांहीं विवक्षित औद्योगिक कामें पार पाडण्यासाठी दिली जाते. त्यामुळें ती दुसऱ्या कामासाठी वापरतां येत नाही. परदेशीय मदतीपैकी कांहीं भाग अनिर्बंध रीतीनें वापरण्याची परवानगी असावी, अशी खटपट भारत सरकार करीत आहे. ह्या बाबतींत सुरुवात म्हणून अमेरिका, पश्चिम जर्मनी, ह्या देशांशीं करारहि करण्यांत आला आहे. परंतु हें 'मुक्त' परदेशीय चलन सध्यां तरी अल्प आहे.

## कारभार चालविण्याचें शिक्षण देणाऱ्या संस्था

धंदा, व्यापार कारखाने इत्यादि संघटना चालविण्याचें शिक्षण देणाऱ्या दोन संस्था स्थापन करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. इंडिअन इन्स्टिट्यूट्स ऑफ मॅनेजमेंट ह्या नांवाच्या दोन संस्था एक कलकत्ता येथें व एक अहमदाबाद येथें उभारण्यांत येणार असून त्यांचें काम बहुधा येत्या सप्टेंबर अगर ऑक्टोबरमध्यें सुरू होईल. भारताच्या शास्त्रीय संशोधन खात्याचे मंत्री प्रा. हुमायून कबीर कलकत्ता येथें ह्याविषयीं बोलतांना म्हणाले कीं, अलीकडे मनुष्याच्या जीवनांतील प्रत्येक क्षेत्रांत शास्त्रीय दृष्टिकोणाची व संघटनेची कांस धरण्याची प्रवृत्ति वाढत आहे. तेव्हां ही प्रवृत्ति व्यापारधंद्याच्या क्षेत्रांतहि दिसावी ह्यांत नवल नाहीं. मॅनेजर्स, पर्यवेक्षक आणि कामगार ह्या सर्वांची कार्यक्षमता वाढवून कमी खर्चात अधिक उत्पादन करण्याचें हें युग आहे. उत्पादनाची प्रक्रिया ही अतिशय गुंतागुंतीची आणि अनेक गोष्टींवर अवलंबून असते. एखाद्या कारखान्यापासून हजारों मैल अंतरावर एखादी गोष्ट घडली, तरीसुद्धां तिचा परिणाम कारखान्यावर घडण्याची शक्यता असते. म्हणून उद्योगधंदे चालविण्याच्या शिक्षणाला अधिकाधिक महत्त्व येत चाललेलें आहे. शिवाय अशा शिक्षणाला सामाजिक बाजूहि असते. हिंदमधील भांडवलदारांपैकी कांहींजण कम्युनिस्टांचे पहिल्या प्रतीचे मित्र आहेत. कारण, ते त्यांच्या मर्जीतले पण नालायक असे लोक वरिष्ठ जागांवर नेमण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळें लायक व कर्तृत्ववान् लोकांना वरिष्ठ जागेपर्यंत पोचणें अशक्य होतें. भारतांत आज लायक लोकांची वाण आहे. त्यामुळें आहेत त्या माणसांमधूनच निवड करावी लागते. योग्य व लायक माणसांतून निवड करण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

## नेपाळला रशिआची आर्थिक मदत

रशिआची आर्थिक मदत घेऊन नेपाळमध्यें एक सिगारेटचा, एक साखरेचा व एक वीजनिर्मितीचा कारखाना स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी रशिया नेपाळला ३२·५ लाख रूबल्स कर्ज देणार आहे. ह्यापैकी ३० लाख रूबल्सचें कर्ज रशिया मालाच्या रूपानें देणार असून बाकीची रक्कम रुपयांच्या रोख चलनांत देणार आहे. १९५९ च्या एप्रिलमध्यें नेपाळ व रशिया ह्यांच्या दरम्यान एक व्यापारी करार करण्यांत आलेला आहे. त्या कराराची पुस्ती म्हणून नवा व्यवहार करण्यांत आला आहे. मालाच्या रूपानें देण्यांत यावयाच्या मदतीची यादी अद्याप व्हावयाची आहे. परंतु विकास योजनांना लागणारी यंत्रसामग्री, सिमेंट, छपरांसाठी लागणारें सामान, इत्यादि वस्तु ह्या यादींत असतील.

## आजच्या गोव्याचें दर्शन

[ "अर्थ" चे एक स्नेही आणि हितचिंतक श्री. स. वा. दातार बी. एस्सी., एलएल. बी., ह्यांनीं त्यांना त्यांच्या मित्राकडून गोव्यातील अनुभव वर्णन करणारें आलेलें पत्र, प्रसिद्धीसाठीं पाठविलें आहे. पत्र दि. २६-१-१९६२ चें असून तें वाचकांना उद्बोधक वाटेल अशी खात्री आहे. ]

मी गोव्याला ट्रेझरी बरोबर गेलों होतों. जातांना आपली करन्सी नेली व येतांना त्यांचे नाणें 'अिस्कुडोज' परत घेऊन आलों. प्रवास दोन्हींहि वेळीं पुणें, बेळगांव, लोंढा, कॅसलरॉक, वास्कोडगामा व पंजीम असा ( रेल्वेनें ) झाला. आतां २६ तारखेपासून तेथें बोट, विमान व डायरेक्ट रेल्वेनें वास्कोडगामा अशी व्यवस्था सुरू झाली. आम्ही गेलों तेव्हां आपल्या हद्दींतील कॅसलरॉक पर्यंत जाऊन तेथें परत त्यांच्या पोर्तुगीज रेल्वेचीं ( सध्या मिलिटरी गव्हर्नरच्या ताब्यांत असलेली ) तिकिटें काढावीं लागलीं. दोन्हींहि वेळां जातांना व येतांना परवाने लागले. अजूनहि परवाना पद्धत चालू आहे.

पंजीम ही गोव्याची राजधानी. हें शहर विमानमार्ग व बोटमार्ग यांनीं जोडलेलें आहे; रेल्वेनें जोडलेलें नाहीं. शेवटचें स्टेशन वास्कोडगामा. येथून पणजी २२-२३ मैल आहे. हा प्रवास मोटारनें करावा लागतो. वाटेंत दाभोळसारखी खाडी आहे. ती ओलांडावी लागते. त्याकरतां तेथें मोटार लॉंचची व्यवस्था आहे. मात्र आमच्याकडील दाभोळ वेलदूर या व्यवस्थेपेक्षां येथील व्यवस्था उत्तम आहे. सर्व व्यवस्था सरकार ( कस्टम ) पाहातें. पूर्वींहि व सध्यांहि मोटार लॉंचेस ( इकडे याला 'वाफर म्हणतात ) फारच मोठ्या व रुंद आहेत. उजेडाची उत्तम व्यवस्था आहे. चढण्या-उतरण्याची उत्तम सोय आहे. पायांना पाण्याचा स्पर्शसुद्धां होत नाहीं. दुसरें वैशिष्ट्य असें कीं, मोटारी आणि सामान भरलेले मोठे ट्रकसुद्धां याच्यावर मालासकट व पॅसेंजर सकट चढवून पलीकडे नेले जातात. मोटारींतील पॅसेंजरना उतरावें लागत नाहीं. एकाच वेळीं दोन वाहनांतून प्रवास! मोठी गंमत वाटते. एकेका वेळीं अशा चार चार, पांच पांच, मोटारी पलीकडे जातात. व शिवाय इतर उतारू.

रेल्वेनें जातांना कॅसलरॉक ते वास्कोडगामा या रस्त्यावर घाट लागतो. एकीकडे उंच कडे व दुसरीकडे खोल दरी. ह्यांच्या मधून रेल्वे जाते. येथील निसर्गदृश्य अतिशय सुंदर आहे. गोव्याच्या सुप्रसिद्ध धबधबा 'दूधसागर' आम्हांला याच मार्गावर पाहावयास मिळाला. घाट उतरून खालीं गेल्यावर छोटीं छोटीं स्टेशनें लागतात. येथून पुढें भातशेती, नारळाचीं झाडें, मॅंगेनीजच्या खाणी, हीं सुरू होतात. नारळाच्या एकाहि झाडाला पाणी नाहीं. तीं सर्व तशींच वाढतात. आणि तीं इतकीं अमोज आहेत कीं तुम्हीं सभोंवार वर्तुळांत नजर फिरवलीत तर सगळीकडे तींच झाडें दिसतील. मुख्य पीक भाताचें. कांहीं ठिकाणीं हें पीक दोनदां काढतात. दुसऱ्या पिकाचीं भातें आतां वीत वीत वर आलीं आहेत. आमच्या कोकणापेक्षां निसर्गवैभव जास्त आहे; व लोकहि जास्त संपन्न आहेत. मुख्य अन्न भात. चपाती दृष्टीससुद्धां पडत नाहीं. माशाची आमटी, व नारळाच्या आंगरसाचा आमटींत व आमसुलाच्या सारांत भरपूर उपयोग करतात. दूध फक्त चहांत. बाकी दूध, ताक, दहीं व तूप नाहीं. पाहिजे तर उंडे ( पाव ) घ्यावे व खावे. दारूची दुकानें मात्र भरपूर. सर्व प्रकारची परदेशी दारू हवी तेवढी अगदी स्वस्त दरानें मिळते. काजूची दारूहि भरपूर मिळते. कमी पैसेवाले लोक ही घेतात. फारच स्वस्त. सर्व गोव्यांत वस्ती अतिशय विरळ. प्रत्येकाचें थोड थोडें उत्पन्न. बैठी घरें; फारतर दोन मजली. बाहेरच्या जगाशीं विशेष संबंध नाहीं. त्यामुळें शहरांतूनहि फार गर्दी, गोंधळ, धांवपळ नाहीं. आमच्या खेडेगांवाप्रमाणें सर्व व्यवहार धिमेपणानें चालू असतात. त्याला साजेसेच दुकानाचें टाईम ९ ते १२ व ३ ते ७॥. त्यानंतर सर्व सामसुम. रविवारीं सर्व बाजार बंद. दारू भरपूर व स्वस्त असूनसुद्धां कोठेंहि आरडाओरडा, मारामारी, किंवा भांडण नाहीं. मोटारी व पॅसेंजरगाड्या परदेशी व उत्तम प्रकारच्या आहेत. प्रमुख शहरें चार पंजीम ( राजधानी ) वास्कोडगामा, म्हापसा व मडगांव. शहरें अजूनपर्यंत तरी अतिशय स्वच्छ राखलेलीं आहेत. रस्ते डांबरी, रुंद, सारखे, सरळ व लांब आहेत. विजेचे दिवे भरपूर आहेत. शहरांची रचना उत्तम आहे.

सध्याचें येथील राहणीमान फार महाग आहे. बाजारांत पहिल्या सारख्या वस्तु नाहींत. मिलटरी लोकांनीहि माल बराच घेतल्यामुळें बराचसा चांगला माल बाजारांतून गडप झाला आहे; व आहे तो महाग झाला आहे. ट्रान्झिस्टर, घड्याळें, असला माल मिलटरी धास्तीनें व पुढच्या आयातीच्या अपेक्षित पॉलिसीमुळें गडप झाला आहे. सैनिकांजवळ मात्र या वस्तु जास्त पाहावयास मिळाल्या.

मी येथें मुक्कामाला असा ५।६ दिवस होतों. ( पणजीला ). तेवढ्यांत मला फक्त एकच रविवार मिळाला. त्या दिवशीं स्पेशल टॅक्सी करून आम्ही खूप हिंडलों. अतिशय वैभवसंपन्न म्हणून गाजलेलीं सर्व देवळें पाहिलीं. मंगेश, नागेश, म्हाळसा, शांतादुर्ग वगैरे सर्व देवळें व्यवस्थित लांबलचक व मोठीं आहेत. व्यवस्था अजूनहि चांगली ठेवलेली आहे. प्रत्येक ठिकाणीं खास पुजारी आहेत. मोठमोठ्या ८-१० समया सारख्या तेवत असतात. मंगेश हें येथील प्रमुख देवस्थान. त्याची मूर्ति सोन्याची आहे. सर्व गोव्याच्या भागांत सुपारी कमी आहे. या देवळांच्या परिसरांत मला कांहीं सुपारीच्या बागा ( कुळागरें ) आढळल्या. रहाणी सर्व कोकणासारखी. बोलाचालीची भाषा कोकणी. ती मराठीला अगदीं जवळची. मराठी सर्वांना समजतें. आतां सर्व कांहीं पूर्ववत् आहे. येथें महागाई वाढण्यास सुरुवात झाली आहे. पोर्तुगिजांनीं उडवलेल्या गोष्टींत दोन प्रमुख पूल आहेत. पैकीं एक तर फारच मोठा आहे. तो साफ मोडून पडला आहे. सर्व सामान्य लोकांना मिलिटरी ॲक्शनमुळें वाईटहि वाटलेलें नाहीं; किंवा फार आनंदहि झालेला नाहीं. मात्र सामान्य जनता महाराष्ट्राच्याच बाजूची आहे. कर्नाटक-म्हैसूरला मिळण्याबद्दल त्यांचा विरोध दिसतो. मी गोव्याला पहिल्यांदाच गेलों. तेथून आल्यावर सहज गंमत म्हणून, सामान्य माहिती म्हणून आपणाला पत्र लिहिलें आहे.

---

### अमेरिकेंतील नाण्यासाठीं चांदी

अमेरिकेनें भारताला दिलेल्या युद्धकालीन रुपयांच्या नाण्यांतील कर्जापैकीं चांदी काढण्याचें काम एका अमेरिकन कारखान्यानें घेतलें आहे. हें कर्ज मुळांत रुपयांच्या स्वरूपांतच अमेरिकेनें दिलें होतें. व तें त्याच स्वरूपांत परत करण्यांत आलें होते. १० हजार टन वजनाचे रुपये कारखान्याकडे पाठविण्यांत आले आहेत. अमेरिकेच्या टांकसाळीकडून दरसाल ५० लाख डॉलर्स घेण्याच्या कराराप्रमाणें हें काम कारखान्यानें घेतलें आहे. रुपयांच्या नाण्यांत घालण्यांत आलेले ५ टक्के तांबें आणि इतर धातु कारखान्यालाच मिळावयाचे आहे. टांकसाळ व कारखाना ह्यांच्यातील करार दोन वर्षांचा आहे.

## स्त्रीला चारित्र्य, तसें बँकेला नीतिसंकेतांचें पालन

बँका एकमेकाला माहिती पुरवितांना ती अचुक आणि असंदिग्ध रीतीनें देतात; ज्या बँकेनें माहिती पुरविली तिच्या नांवाचा उपयोग करीत नाहींत. माहिती देण्यांत कसूर करणें हें प्रतिकूल मत व्यक्त करण्यासारखेंच नुकसानकारक ठरण्याचा संभव असतो.

हितसंबंधांत विरोध निर्माण होण्याचे प्रसंगीं विशेष सावधगिरी आवश्यक असते. जनतेजवळील पैसा गोळा करून, तो कर्जाऊ देणें आणि कर्जवसुली करणें, चेक्सची देवघेव करणें आणि भागदारांना नफा देणें, हें व्यापारी बँकेचें काम.

पण बँकर हा मनुष्यप्राणी आहे. त्याला मित्र आणि नातेवाईक असतात; स्वतःची पत्नी व मुलेंबाळें असतात; स्वतःच्या वार्धक्याची तरतूद करावयाची असते.

त्याचा भाऊबंद व्यापारांत आहे; त्यानें बँकेकडून कर्ज घेतलेलें आहे पण तें फेडूं शकत नाहीं. अशा वेळीं, बँकर त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे बाबतींत दक्ष असतो किंवा नाहीं; इतर कर्जदारांप्रमाणेंच त्याला वागवतो किंवा नाहीं; का त्याला मुदत वाढवून देतो किंवा कर्जफेडीसाठीं नवें कर्ज देतो?

तो इतर गिऱ्हाइकांचे बाबतींत जें करील, तेंच भाऊबंदाचे बाबतींतहि त्यानें केलें पाहिजे. पण समजा, बँकरनें भाऊबंदाच्या धंद्यांत स्वतःचे कांहीं पैसे गुंतविलेले आहेत; आणि ते धोक्यांत आहेत. असे प्रसंग वरचेवर येतात. म्हणून, ज्या धंद्याला कर्ज द्यावयाचें, त्याच्याशीं बँकरचा आर्थिक हितसंबंध असूं नये.

आयसेनहोअर अमेरिकेचे प्रेसिडेंट झाले, तेव्हां त्यांनीं आपली सर्व मिळकत एका ट्रस्टकडे व्यवस्थेसाठीं दिली, त्याचा हेतु कोणताहि निर्णय घेतांना आपल्या हितसंबंधांचा विचारहि डोक्यांत येऊं नये असा होता.

हा आदर्श रोजच्या व्यवहारांत अमलांत आणतां येणें जमणार नाहीं. असा नियम बँकर्सना लागू केला, तर चांगले मोठे, बँकर्स मिळणारहि नाहींत. पण, आपल्या जागेचा फायदा घेऊन स्वतःचें, मित्रांचें आणि नातेवाईकांचें हित साधण्याचा प्रयत्न करण्याचें टाळणें सर्वच बँकर्सना शक्य आहे.

एखाद्या गांवांत एखादा मोठा कारखाना असतो. तो चांगला चाललेला असतो. तो कारखानदार बँकेचाहि चेअरमन असतो. बँकेनें अशा कारखान्याशीं व्यवहार न करणें हास्यास्पद ठरेल; हितसंबंधांचा विरोध हें कारण समर्थनीय ठरणार नाहीं. बँकेला एक चांगलें गिऱ्हाईक गमवावें लागेल, किंवा गांवांतील हुशार कारखानदाराच्या सल्ल्यास मुकावें लागेल. अशा कर्जाची छाननी करण्यासाठीं डायरेक्टर बोर्डानें स्वतंत्र कमिटी नेमली, म्हणजे मार्ग निघेल. ज्याप्रमाणें स्वतःचा हितसंबंध असणाऱ्या प्रश्नाचे बाबतींत पंच भाग घेत नाहींत, त्याचप्रमाणें हितसंबंधी डायरेक्टर, बँक-अधिकारी, इत्यादींनीं वागलें म्हणजे झालें. कायद्याच्या बंधनापेक्षा स्वतः लादून घेतलेले नीतिनियम अधिक चांगले.

कित्येक प्रसंगीं बँकेचा ऑडिटर नैतिक पेंचप्रसंगांत सांपडतो. बँकेचा कारभार कायद्याला धरून आहे, पण बँकिंगच्या नीति–नियमांना धरून नाहीं असें त्याला आढळलें, तर त्यानें काय करावें? कालांतरानें घडून येणाऱ्या परिणामांसाठी त्यानें आज राजीनामा देऊन त्यांच्यापासून मोकळें व्हावें, का त्याची बँकेच्या, समाजाच्या, बाबतीत कांहीं खास जबाबदारी आहे? त्यानें स्वतःच्या, बँकेच्या अधिकाऱ्यांच्या आणि मित्रांच्या हितापेक्षा ह्या जबाबदारीस जास्त महत्त्व द्यावें किंवा नाहीं?


टेलिफोन नं. २४८३.

### पुणें सेंट्रल
### को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

**इकडे वेळींच लक्ष द्या..........**

आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | | | व्याजाचे नवीन दर |
|---|---|---|---|
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४। टक्के |
| ३ वर्षें | ... | ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव | ... | ... | २॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

वा. ग. अठलेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.



### दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

**हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.**

टेलिफोन नं ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः–युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :–२ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४ टक्के, २ वर्षें–४·२५ टक्के, ३ वर्षें–४·५० टक्के, ४ वर्षें–४·७५ टक्के, ५ वर्षें–५ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

**शाखा विस्तार**

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंबज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ४ ३०,००० |
| ठेवी | रु. | २,८७,२१,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ३,२१ ००,००० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी. बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी. चेअरमन.

त्याला उत्तर स्पष्ट आहे. बँकेच्या भागदारांच्या जिंदगीचें जतन करणें हें ऑडिटरचें आद्य कर्तव्य आहे.

बँकरच्या सामाजिक कर्तव्याची व्याप्ति किती मोठी आहे, याचें उदाहरण येथें देतों. एक मोठा बँकर नेहेमीं म्हणत असे, "जर एखाद्या बँकप्रमुखानें तज्ज्ञ आणि लायक व्यवस्थापकांच्या एकामागून एक अशा पिढ्या तयार करून ठेवण्याकडे दुर्लक्ष केलें, तर त्याला मी बेजबाबदारच म्हणेन. त्यानें बँकेच्या कॅशला हात लावण्यापेक्षाहि मोठें नुकसान त्यामुळें घडून येईल."

हे शब्द अतिशय कडक वाटतील. पण, बँक मजबूत असून आणि तिचे फंड्स तरते असून पुरत नाहीं. विद्यमान व्यवस्थापक गेले, तरी व्यवस्था पूर्वीसारखीच कार्यक्षम राहिली पाहिजे. विद्यमान व्यवस्थापक आज आहे, म्हणून तो उद्या असेलच कशावरून? आपल्या जागीं येणारे त्यानें आधींच तयार करून ठेवायला हवेत. त्यांत हयगय झाली, तर ते नीतिबाह्य वर्तन ठरेल!


बँकर स्पर्धेला कंटाळण्याइतका वयस्कर झाला असेल, दगदग त्याला नकोशी झाली असेल, तो आळसावला असेल, तर त्यानें आपली जागा अधिक उत्साही लोकांना द्यायची वेळ आली आहे, असें समजावें.

बँकेनें इतर बँकांवर टीका करून, त्यांचे दोष काढून, धंदा वाढविण्याचा प्रयत्न करूं नये. एका कंपनीच्या नांवानें चेक काढलेला होता. कंपनीच्या अधिकाऱ्याला चेक एडार्स करण्याचा अधिकार होता. त्याप्रमाणें त्यानें चेकवर सही करून तो बँकेकडे वटविण्यास पाठवला. बँकेनें पैसे देण्याचें नाकारलें, तशी कंपनीचा तो अधिकारी संतापला. तो त्याच रस्त्यावरच्या प्रतिस्पर्धी बँकेकडे गेला, आणि "आपल्याला मिळालेल्या अपमानास्पद वागणुकीमुळें, मला तुमच्या बँकेकडे सर्व व्यवहार द्यायचा आहे" असें म्हणाला. प्रतिस्पर्धी बँकरनें उत्तर दिलें, "तुमचें खातें आमच्याकडे आलें, तर आम्हांला आनंदच होईल. पण, आम्हींहि तो चेक कॅश केला नसता!" कां, तें कारणहि त्यानें समजावून सांगितलें. गिऱ्हाइकावर बँकरचा सरळपणाचा इतका परिणाम झाला, कीं त्यानें खातें उघडलेंच!

स्टॉक एक्सचेंजवरती होणारे कोट्यवधि रुपयांचे व्यवहार सही किंवा पावती न देतां होतात. माणसानें दिलेला शब्द पुरतो; व्यावसायिक नीति उच्च दर्जाची असते; नुकसानीचा संभव असला तरी खोटेपणा केला जात नाहीं.

कोणत्याहि व्यवहाराचें सत्य स्वरूप ओळखणें ज्या सचोटीनें आणि स्वाभिमानानें शक्य होतें, त्यालाच नीति म्हणावयाचें. बँकर्सनीं केवळ कायद्याच्या कचाट्यांत न सांपडण्यापुरतेंच पहावयाचें नाहीं, तर नीतीच्या उच्च पातळीचा अवलंब आपण होऊन करायला हवा. त्यावरच बँकेची विश्वासार्हता आणि जनतेची श्रद्धा हीं अवलंबून असतात. जनतेच्या पैशाचे विश्वस्त या नात्यानें बँकेचा दैनंदिन कारभार चालविण्यांत आला तर तिचा उत्कर्ष झाल्याविना राहाणार नाहीं. स्त्रीला जसें चारित्र्य, तसें बँकेला नीतिसंकेतांचें महत्त्व!


किर्लोस्कर
स्थापना १८८८



भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतात. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)

दातांच्या स्वच्छतेसाठी
माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

कण आणि क्षण
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)
लेखक: - श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'
मराठी दुसरी आवृत्ति [किं. १ रु. ८ आ.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

## सॉलिसिटरची फर्म ही " इंडस्ट्री " नाहीं

### सुप्रीम कोर्टाचा निवाडा

" औद्योगिक तंट्याचें मुख्य लक्षण म्हणजे तो तंटा एखाद्या उपक्रमांतील भांडवल आणि कष्ट ह्यांतील असायला हवा. जेथें भांडवल आणि कष्ट हीं एकत्र येऊन जिनसांचें उत्पादन करतात किंवा सेवा घडवून आणतात, तेथेंच औद्योगिक तंटा उद्‌भवूं शकतो " असे उद्‌गार सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती गजेंद्रगडकर ह्यांनीं एका अपिलाच्या निवाड्यांत काढले. परेरा, फाझलभाई आणि कंपनी ह्या सॉलिसिटर्सच्या फर्मकडून तिच्या नोकरांनीं १९५६ आणि १९५७ सालासाठी बोनसची मागणी केली होती. फर्मचें म्हणणें, तिचा व्यवसाय इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टाच्या कक्षेंत येत नाहीं, असें होतें. सुप्रीम कोर्टानें तें उचलून धरलें.

## सोडतीमधील बक्षिसाची वसुली

### मद्रास हायकोर्टाचा निवाडा

कुंभकोणम येथील जी. के. मूर्ती ह्यानें आर. एम. डी. सी. ( म्हैसूर ) लि. कडून क्रॉसवर्ड स्पर्धेत आपल्याला मिळालेल्या ८०,००० रुपयांच्या पहिल्या बक्षिसाची रक्कम मिळावी, अशी मागणी केली. म्हैसूर हायकोर्टापर्यंत हें प्रकरण गेलें. " क्रॉसवर्ड कोड्यांची स्पर्धा सोडतीच्या स्वरूपाची आहे, असें सुप्रीम कोर्टाचें मत आहे; आणि इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्टाच्या ३०व्या कलमान्वयें सोडतींतील बक्षिसाच्या वसुलीच्या दाव्यास प्रतिबंध असल्यामुळें, मूर्ती ह्याचा बक्षीसाच्या वसुलीचा दावा चालू शकणार नाहीं " असें म्हैसूर हायकोर्टानें ठरविलें.

## कोळशाच्या खाणीच्या धंद्यांत राज्यांची भागीदारी

कोळसा, लोखंड, पोलाद, इत्यादि भारी उद्योगधंद्यांचे क्षेत्रांत भारत सरकार मुख्यतः भाग घेत असतें. कारण, ह्या धंद्यांसाठी लागणारा पैसा राज्य सरकारकडून उभारला जाणें कठीण असतें. पण अलीकडे कांहीं राज्य सरकारें कोळशाच्या खाणीच्या धंद्यांत भागीदारी मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. मध्यवर्ती सरकार ह्या प्रयत्नाकडे सहानुभूतीनें पाहात असून राज्य सरकारांना ह्या धंद्यांत सामील करून घेण्यासाठी एखादी यंत्रणा उभारण्याचा विचार करीत आहे. अशा प्रकारचें उदाहरण मुळींच नाहीं अशांतला प्रकार नाहीं. आंध्र राज्यांतील सिंगेराणी खाणींत राज्यसरकार भागीदार आहे. पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या पुढाकारानें कलकत्ता येथें एक परिषद गेल्या महिन्यांत भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेंत कोळशाच्या खाणी असलेल्या सात राज्यांच्या प्रतिनिधींनीं भाग घेतला होता. परिषदेंत असे विचार व्यक्त करण्यांत आले कीं, राष्ट्रीय कोळसा विकास कॉर्पोरेशनच्या सहकार्यानें अगर स्वतंत्ररीत्या कोळशाच्या खाणी उघडण्याची परवानगी राज्य सरकारांना देण्यात यावी. पश्चिम बंगालमधील कोळशाच्या खाणींचा आणखी विकास घडवून आणण्यासाठी डॉ. बी. सी. रॉय ह्यांनीं पोलंडच्या सरकारशीं वाटाघाटीहि चालू केल्या आहेत. पोलंडकडून तांत्रिक साह्य मिळविण्याचा त्यांचा विचार आहे. गेल्या कांहीं वर्षांत भारतामधील घटक राज्यांत कांहीं ठिकाणीं कोळशाच्या खाणी सांपडलेल्या आहेत. महाराष्ट्रांतील विदर्भांत कोळसा सांपडलेला आहे. असें असलें तरी खाणी उघडण्यासाठी लागणारा पैसा व तंत्रज्ञ ह्यांची वाण सर्वच राज्यांत आहे. म्हणून मध्यवर्ती सरकारच्या अनकूल निर्णयाचाहि उपयोग होणें कठीण आहे.


# दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९१९

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : रुपये सहा लाख |
| खेळतें भांडवल | : रुपये एक कोट |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : रुपये सात लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुदत ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

| | |
|---|---|
| १ वर्ष ३¾% | ३ वर्षे ४¼% |
| २ वर्षे ४% | ४ वर्षे ४½% |
| ५ वर्षे ५% | |

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखाः सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, ॲड्व्होकेट, चेअरमन. | के. डी. शिराळकर, मॅनेजर.

# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ५१,५०० |

बँक लौकरच स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें विलीन होणार आहे.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज-वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

| | |
|---|---|
| श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष |
| श्री. गो. बा. देवी | श्री. बा. ग. धंद्रुके |

## रोगजंतूंचा नाश करणारें औषध

बलसाड येथें रोगजंतूंचा नाश करणारें एक औषध निर्माण करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठी अमेरिकन तंत्रज्ञांचें साह्य मिळणार आहे. ह्या औषधाचा विशेष म्हणजे तें गरम रक्त असणाऱ्या प्राण्यांना धोकादायक नाहीं. हें औषध हिवतापाचा रोग पसरविण्याऱ्या डांसांविरुद्ध विशेष उपयुक्त आहे. जागतिक आरोग्यसंघटनेनें त्याला मान्यता दिलेली आहे. औषधाचा कारखाना १९६३ च्या प्रारंभीं सुरू होईल. त्याच्या उभारणीसाठी २० लाख डॉलर्स भांडवल लागेल.

---

## मित्र जोडण्याची कला शिकविणारें पुस्तक

सुप्रसिद्ध आंग्ल लघुनिबंधकार गार्डिनर म्हणतो, "'Thank you,' 'sorry are coins in daily routine of life; they produce pleasure in the social atmosphere." त्याच्या या उक्तीचें आपण आपल्या 'दाणे आणि खडे' या पुस्तकांत मुद्देसूद व आकर्षक प्रतिपादन केलेलें आहे. रीतीरिवाजांच्या व सभ्यतेच्या वर्तुळावर फिरणाऱ्या मनुष्यास आपण हरघडीच्या जीवनांतील प्रसंगांचे धडे देऊन मार्ग दाखविलेला आहे.

घरगुती भाषा, स्वयंपाकघरांतील मनमोकळेपणा, हृद्य प्रसंगांचें हळुवार चित्रण, मनोवेधक दृष्टान्त, परिचित असें व्यक्तिदर्शन, विस्तृत विषयांत सुयोग्य खोली, यामुळें आपलें पुस्तक* लवकरच लोकप्रिय होईल असा विश्वास वाटतो.

कांहींसें फटकून वागणाऱ्या मराठी मनाला आपण मित्र जोडण्याची कला शिकविलीत. धन्यवाद !

२८ अ, बुधवार, पुणें २. —शशिकांत रणछोड मोडे.

* "दाणे आणि खडे" किंमत २=५०.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें

## नोटीस

नोटीस देण्यांत येते कीं बँकेचे भागीदारांची २७ वी वार्षिक साधारण सभा मंगळवार दिनांक २७ मार्च १९६२ रोजीं दुपारीं २-३० वाजतां (भारतीय प्रमाण वेळ) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस, महाराष्ट्र बँक अिमारत, ११७७ बुधवार पेठ, पुणें शहर या ठिकाणीं नेहमींचे कामकाजासाठीं म्हणजे ३१ डिसेंबर १९६१ चा ताळेबंद व नफातोटा पत्रक यांचा विचार करणें, हिशेबतपासनीसांची नेमणूक करणें वगैरेंसाठी व कांहीं विशेष स्वरुपाचे कामकाजासाठी भरेल. सभेपुढें येणारें विशेष स्वरुपाचे कामकाजाचा तपशील भागीदारांस बँकेचा दिनांक ३१ डिसेंबर १९६१ अखेरचा ताळेबंद व नफातोटा पत्रक व संचालकांचा अहवाल यासोबत स्वतंत्रपणें पाठविण्यांत येत आहे.

बोर्डाचे हुकुमावरून,
पुणें, सी. व्ही. जोग
दिनांक १३ फेब्रुवारी १९६२ जनरल मॅनेजर.

बँकेची शेअर ट्रॅन्सफर बुकें दिनांक १४ मार्च, १९६२ ते दिनांक २८ मार्च, १९६२ (दोन्हीं दिवस धरून) बन्द राहतील.

---

डिव्हिडंड मंजूर झाल्यानन्तर ते शनिवार दिनांक ७ एप्रिल १९६२ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरन्टस भागीदाराच्या नोंदलेल्या पत्त्यावर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.



## नेपाळमध्यें हिंदी उद्योगपतींची कापडाची गिरणी

नेपाळमध्यें वीरगंजजवळ कापडाची गिरणी काढण्याचें बिर्लांनीं ठरविलें आहे. गिरणीच्या उभारणीसाठी २.१९ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. ही गिरणी काढण्याबाबत नेपाळ सरकार व बिर्लाशेठ ह्यांच्यांत गेलीं ३ वर्षें वाटाघाटी चालू होत्या. आतां उभयतांमधील करारावर सह्या करण्यांत आल्या आहेत. गिरणींत ४०० चात्या आणि १५,००० माग बसविण्यात येणार आहेत. नेपाळमध्यें मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतविणारा पहिला परदेशीय उद्योगपति म्हणून बिर्ला ह्यांचा उल्लेख करावा. लागेल. गिरणींत नेपाळचे सरकार भांडवल गुंतविणार नाहीं. तथापि, गिरणीच्या संचालक मंडळावर तीन नेपाळी डायरेक्टर मात्र राहातील.

---

## लॉर्ड डाल्टन—ब्रिटिश मजूर पक्षांतील एक थोर व्यक्ति

लॉर्ड डाल्टन हे लंडन येथें दि. १३ फेब्रुवारी रोजीं मृत्यु पावले. त्यांचें वय ७४ वर्षांचें होतें. मजूर पक्षाच्या मंत्रिमंडळांत ते अर्थमंत्रि असतांना, १९४७ च्या अंदाजपत्रकाचा कांहीं तपशील पार्लमेंटांत त्यांचें भाषण होण्यापूर्वींच प्रसिद्ध झाला, तेव्हां एक दिवसहि न थांबतां त्यांनीं राजीनामा दिला, कॉमन्स सभेंत हजर राहून टीकेला तोंड दिलें आणि बजेट फुटल्याची जबाबदारी पत्करली. ह्यामुळें त्यांचेविषयीं आदर खूपच वाढला.

---



★ सुवर्ण-महोत्सवी वर्ष ★

## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई

(दि विदर्भ सहकारी बँक लिमिटेड सम्मीलित)

| मुख्य कचेरी— | विभागीय कचेरी— |
|---|---|
| ९, बँक हाऊस लेन, | महाल-नागपूर |
| फोर्ट, मुंबई | तारेचा पत्ता— |
| टेलिफोन नं. २५५४७४-७५ | फार्मर बँक |

**: बृहन्मुंबईतील शाखा :**

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रुझ

**: नागपूर विभागांतर्गत शाखा :**

(१) सिताबर्डी (२) अमरावती (३) चांदा (४) मलकापूर (५) खामगांव (६) बुलढाणा

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. ३ कोटी, ६० लाख |
| गंगाजळी व फंड | रु. १ कोटी, ४ लाख |
| ठेवी | रु. १९ कोटी, १० लाख |
| खेळतें भांडवल | रु. ५४ कोटी, ८६ लाख |

*महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.*

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.

## सन १९६१ मध्यें ६६८ कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात

भारतानें १९६१ मध्यें एकूण ६६८ कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात केली. १९५१-५२ हें वर्ष वगळतां हा एक उच्चांकच आहे. त्या वेळीं कोरिया युद्धामुळें निर्यात मालाच्या किंमती वाढलेल्या असल्यामुळें आंकडा मोठा होता.

सन १९६० शीं तुलना करतां १९६१ मध्यें ३४ कोटी रुपये किंमतीच्या मालाची अधिक निर्यात झाली. हा आंकडा तिसऱ्या योजनेंत १९६१-६२ साठी अपेक्षिलेल्या आंकड्यांहून १ कोटीनें अधिक आहे. चहा, अशुद्ध मँगेनीज, न कमाविलेलीं कातडीं व चामडीं, मसाल्याचे पदार्थ, पेंड, तंबाकू या आपल्या नित्याच्या निर्यात मालाच्या जागतिक किंमती या वर्षांत घसरल्या असतांहि निर्यात १९६० पेक्षा ३४ कोटी रुपयांनीं जास्त झाली ही गोष्ट महत्त्वाची आहे. सरासरी किंमतींत घट होऊनहि चहा, तंबाकू, कॉफी, ह्यांच्या निर्यातींतून उत्पन्नांत बरीच वाढ झाली आहे. कांहीं वस्तूंच्या निर्यातींतून झालेली उत्पान्नांतील घट तागी-माल, साखर, कृत्रिम रेशमी कापड, इत्यादींच्या वाढत्या निर्यात उत्पन्नांतून भरून निघाली. लोखंड आणि पोलाद, धातूंच्या वस्तु, यंत्रसामग्री व वाहतूक सामग्रीच्या निर्यातींतून जानेवारी-नोव्हेंबर १९६१ या कालावधींत १६ कोटी रुपयांचें परकीय चलन मिळालें. १९६० चा हाच आंकडा ११ कोटी रुपये होता.

## परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीचें स्वरूप

प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ. गुलाटी अहमदाबाद येथें बोलतांना म्हणाले कीं भारताला मिळणाऱ्या परदेशीय मदतींत कर्ज व देणग्या ह्यांचा अंतर्भाव असतो. कर्जे परत करावी लागणार असल्यानें भारत देणग्या स्वीकारण्यास तयार होणार नाहीं असें नाहीं. पहिल्या कर्जाची फेड करण्यासाठी नवीं कर्जे घेण्याचा मार्ग भारतानें स्वीकारूं नये. कारण त्यामुळें एका घातक चक्रांत सांपडल्यासारखें होईल. अविकसित देशांना बाहेरून जी मदत मिळते तिचें पृथक्करण केल्यास असें आढळून येईल कीं आशि-आंतील अनेक देश अनेक कारणांसाठी देणग्याऐवजीं कर्जाऊ रकमा घेणेंच पसंत करतात. गेल्या दहा वर्षांत भारताला देणग्या-पेक्षा कर्जाऊ रकमच अधिक मिळालेली आहे. देणग्या मिळणार नाहींत असें नाहीं. पण भारतालाच त्या घेण्याची फारशी इच्छा नाहीं.

## अरबी देशाच्या युवराजाचें परदेशी रक्त लपत नाहीं

जॉर्डनचा राजा हुसेन, ह्याची इंग्रज पत्नी ३० जानेवारी रोजीं प्रसूत होऊन मुलाचें नांव प्रिन्स अबदुल्ला असें ठेवण्यांत आलें. ही इंग्रज पत्नी विवाहापूर्वी कुमारी टोनी गार्डिनर ह्या नांवानें ओळखली जात होती; तिला आतां हर रॉयल हायनेस प्रिन्सेस मुना अल हुसेन असा किताब देण्यांत आला आहे. हुसेनचा टोनीशीं विवाह झाला, तो २५ मे, १९६१ रोजीं; म्हणजे त्यानंतर बरोबर ८ महिने आणि ५ दिवस गेल्यावर अबदुल्ला जन्म पावला. ज्या देशाचा धर्म मुसलमानी आहे आणि ज्याची भाषा अरबी आहे अशा देशाच्या गादीचा वारस अरबी बाप आणि बिगर-अरबी आई ह्यांचा मुलगा असावा, ही गोष्ट अनिष्ट आहे, असा प्रचार कैरोंतील वृत्तपत्रांनीं सुरू केला आहे. प्रिन्स अबदुल्ला थेट आपला आजा, कर्नल गार्डिनर ह्याच्यासारखा दिसतो !

## रोगराईमुळें पिकांचा होणारा नाश

अमेरिकेंतील एका शेतीतज्ज्ञाचा असा अंदाज आहे कीं भारतामधील एकूण अन्नधान्याच्या पिकांपैकी १० ते १५ टक्के धान्य रोगराई व कीड ह्यांच्यामुळें नाश पावतें. त्याशिवाय २६ लाख पौंड गहूं उंदरासारख्या प्राण्यांच्या भक्ष्यस्थानीं पडतो. अन्नधान्याचा सांठा व व्यवस्था ह्यासंबंधीं भारत सरकारला सल्ला देण्यासाठी हा तज्ज्ञ आलेला आहे. भारतामधील खेड्यांतून राहणारे लोक मोठ्या संख्येनें शहरांत स्थलांतर करीत आहेत. त्यामुळें येत्या चाळीस वर्षांच्या काळांत यांत्रिक शेतीचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होईल; कारण ग्रामीण भागांत शेतीचीं कामें करण्यास माणसें मिळणें अवघड होईल असा त्यांचा अंदाज आहे.

## नवीन शोधांबद्दल दोन महाराष्ट्रीयांना बक्षिसें

मध्यवर्ती व्यापार व उद्योगखात्याच्या संशोधन चालना मंडळानें नवीन शोधांबद्दल २५० ते २,००० रुपये रोख रकमेचीं आणखी १० जणांना पारितोषिकें दिलीं आहेत. यापूर्वी या मंडळानें २१ संशोधकांना पारितोषिकें दिलीं होतीं.

यामध्यें मुंबईचे श्री. भास्कर बाळकृष्ण देशपांडे यांना १,००० रुपयांचें पारितोषिक मिळालें असून तें स्वरसप्तकाची आपोआप जुळणी होण्याच्या संशोधनाबाबत आहे. पुण्याचे श्री. एस्. जी. एकबोटे यांना, जंतुनाशकांचे फवारे मारण्यासाठी लो व्हॉल्यूम स्प्रे नॉझल शोधून काढल्याबद्दल ५०० रुपयांचें पारितोषिक मिळालेलें आहे.

## आसाममधील तेलउत्पादनांत वाढ

आसाममधील दिग्बोई आणि नाहरकटिआ येथील तेलाच्या कारखान्यांतून शुद्ध करण्यांत येणाऱ्या तेलांत वाढ झाली आहे. त्यामुळें १९६१ मध्यें भारताची ५ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत झाली. दिग्बोई येथील कारखान्यांत गेल्या सालीं ५२ कोटी, ६८ लाख लिटर तेल शुद्ध करण्यांत आलें. त्याशिवाय कारखान्यानें तेलापासून निघणारे १०० उपपदार्थ तयार केले. १९६१ पर्यंत आसाम, मणिपूर आणि त्रिपुरा भागांच्या तेलाच्या गरजा दिग्बोई कारखान्याकडून पुरविल्या गेल्या व त्याशिवाय ईशान्य भारतामधील कांहीं भागांनाहि तेलाचा पुरवठा करण्यांत आला. ह्या वर्षी गोहाटीमधील कारखाना चालू झाल्यामुळें आसाममध्यें उत्पन्न होणारे तेलपदार्थ भारताच्या दूर असलेल्या भागांनाहि पुरविता येतील.

## भारताच्या रेल्वेमार्गासाठी रूळ

भारतानें रशिआकडून रेल्वेमार्गाच्या रुळांची खरेदी केली आहे. एकूण ६० हजार टन वजनाचे रूळ घेण्यांत येणार असून त्यांपैकी १० हजार टन रूळ भारतांत आले आहेत. जुने रूळ बदलण्यासाठी, एकेरी मार्ग दुहेरी करण्यासाठी आणि नवे रेल्वे-मार्ग बांधण्यासाठी भारताला चालू वर्षी ४·५ लाख टन वजनाच्या रुळांची जरूरी आहे. त्यांपैकी निम्म्या वजनाचे रूळच फार तर देशांतल्या देशांत मिळूं शकतील. ही तूट भरून काढण्यासाठी परदेशांतून आयात करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. म्हणून भारता-च्या रेल्वेखात्यानें ८५ हजार टन पोलंडकडून, ४० हजार टन झेकोस्लोव्हाकिआकडून आणि ५५ हजार टन रूळ युगोस्लाव्हि-आकडून घेण्याचें ठरविलें आहे.

## चीनला ब्रिटिश विमानांचा पुरवठा

ब्रिटन चीनला व्हायकौंट प्रकारची विमानें विकत देणार असल्याची वार्ता होती. आतां ह्या वार्तेला दुजोरा मिळाला आहे. ब्रिटननें चीनला अशा प्रकारची सहा विमानें पुरविलीं असून त्यांना लागणारे सुटे भाग, वंगणाचें तेल, इत्यादि मालहि पुरविला आहे. चीननें आपल्या देशांतील विमानवाहतूक करण्यासाठी ही विमानें खरेदी केली असल्याची शक्यता आहे. परंतु भारत व चीन ह्यांच्यांत सध्या चालू असलेल्या सरहद्दीच्या तंटयाचा विचार करतां ह्या घटनेला लष्करी अर्थ असणें संभवतें. चीन भारताच्या उत्तरेकडील सरहद्दीवर सैन्याची जमवाजमव करीत असल्याची बातमी आहे. ह्या सैन्याला दाणागोटा व इतर कुमक पोंचविणें हे डोंगराळ प्रदेशामुळें फार अवघड काम आहे. ह्या कामीं वरील ब्रिटिश विमानें वापरण्यांत येण्याची शक्यता आहे.

## यंत्रचलित कारखान्यांमुळें बेकारीची वाढ

लोकशाही संस्थांचा अभ्यास करणारे एक केंद्र अमेरिकेंत आहे. ह्या केंद्रातर्फे यंत्रचलित उत्पादन पद्धतीची पहाणी करण्यांत येऊन एक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. अहवालांत असें म्हटलें आहे कीं, औद्योगिक क्षेत्रांत यंत्रचलित उत्पादन करण्याची पद्धत अमेरिकेंत झपाट्यानें वाढत आहे. त्यामुळें बेकार लोकांच्या संख्येची प्रचंड वाढ होऊन अमेरिकन समाजांत अस्वस्थता उत्पन्न होण्याचा फार मोठा धोका आहे. तसें झाल्यास व्यक्तिस्वातंत्र्यावर उभारलेल्या समाजाचा पायाच कमकुवत झाल्याशिवाय राहणार नाहीं. यंत्रचलित उत्पादनाची पद्धत अशीच पसरत गेल्यास कारखान्यांतील कामगार, शेतमजूर, कारकून, इत्यादींच्या पोटावर पाय येईल व त्यांना पोसण्यासाठी सरकारला सार्वजनिक कामें काढावीं लागतील.

## बोटींना लागणारी एंजिनें तयार करणार

बोटींना लागणारी तेलावर चालणारीं एंजिनें तयार करण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. अशीं एंजिनें तयार करणाऱ्या दोन परदेशी कारखान्यांची मदत ह्या बाबतींत घेण्यात येणार आहे. एक कारखाना पश्चिम जर्मनींतील असून दुसरा डेन्मार्कमधील आहे. दोन्ही कारखान्यांनीं भारत सरकारला सहकार्य देण्याचें कबूल केलें आहे. भारतांत काढण्यांत यावयाचा हा कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांतील असेल. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री परदेशांतून आणण्यांत यावयाची असून त्यासाठी लागणारें परदेशीय चलन उपलब्ध करून देण्याची तयारीहि कारखान्यांनीं दाखविली आहे.

## कमी खा, अधिक जगा व निरोगी राहा

मुंबई येथील जी. एस. मेडिकल कॉलेजमध्यें हृदयविकारावरील तज्ज्ञ डॉक्टरांचा एक परिसंवाद भरविण्यांत आला होता. ह्या परिसंवादाला परदेशामधूनहि कांहीं डॉक्टर्स आले होते. परिसंवादांत बोलतांना अमेरिकेचे डॉ. पॉल डी व्हाइट म्हणाले कीं ज्या लोकांना दीर्घायुष्य व आरोग्य पाहिजे असेल त्यांनीं कमी खावें आणि व्यायाम मात्र जरा अधिक करावा. वक्तशीर वागणूक आणि नियमित संवयी ह्यांचीहि तितकीच आवश्यकता आहे. शरीराच्या निरनिराळ्या अवयवांना ताण देणारा व्यायाम घेतला तर रक्ताभिसरण चांगलें होतें आणि माणसाचें शरीर दीर्घकालपर्यंत आपलें व्यापार चांगल्या रीतीनें करूं शकतें असा अनुभव आहे.

## मुंबईमधील इस्पितळांत जागा दुर्मिळ

मुंबईमधील प्रसिद्ध धन्वंतरी डॉ. बी. बी. योध ह्यांचे रोटरी क्लबपुढें भाषण झालें. मुंबईमधील आरोग्याच्या सोयींबद्दल बोलतांना ते म्हणाले, कीं मुंबई शहरांत दोन लाखांपेक्षा अधिक लोकांना फुफ्फुसाचा क्षय झालेला आहे. त्यांपैकीं निदान निम्म्या लोकांना तरी इस्पितळांत प्रवेश मिळणें अतिशय जरूरीचें आहे. नाहींतर ह्या रोगाचा प्रसार होण्याचा धोका आहे. परंतु मुंबईमधील इस्पितळांत इतकी गर्दी आहे कीं ह्याचा विचारहि करतां येणार नाहीं. २५ वर्षांपूर्वी जशी परिस्थिति होती तशीच आजहि आहे. गेल्या १५ वर्षांत सरकार आणि मुंबई कॉर्पोरेशन ह्यांनीं प्रयत्न करून इस्पितळांमधील जागा तिपटीनें वाढविल्या आहेत. तरीहि इस्पितळांत प्रवेश मिळणें मुष्किलीचें झालें आहे. रोग्यांची घरींच काळजी घेण्याचें शिक्षण देण्याची फार जरूरी आहे.

## भारतासंबंधीं ब्रिटिश पुस्तकांचें प्रदर्शन

ब्रिटिशांनी भारतासंबंधीं लिहिलेल्या दुर्मिळ पुस्तकांचें एक प्रदर्शन मुंबईमध्यें भरविण्यांत आलें आहे. ह्या प्रदर्शनांत १,६०० पुस्तकें असून तीं गेल्या तीन शतकांत प्रकाशित झालेलीं आहेत. सगळ्यांत जुनें पुस्तक १६७२ मध्यें छापण्यांत आलेलें असून तें प्रवासाविषयक आहे. पुस्तकांत अहमदाबाद व सुरत सारख्या शहरांतील देखाव्यांचीं रेखाचित्रेंहि आहेत. प्रदर्शन ब्रिटिश कौन्सिलतर्फे भरविण्यांत आलें आहे. त्यामधील पुस्तकें निरनिराळ्या ठिकाणांहून गोळा करण्यांत आलीं आहेत. परंतु बरींचशीं पुस्तकें ब्रिटनमधील जुन्या पुस्तकांच्या दुकानांतून मिळालीं. १७८५ सालीं प्रसिद्ध करण्यांत आलेलें गीतेचें एक भाषांतरहि प्रदर्शनांत आहे.

**आजारी गुरांना मोफत उपचार** — मद्रास राज्यांतील गुरांच्या दवाखान्यांतून आजारी असलेल्या गुरांना मोफत उपचार करण्याची सवलत ठेवण्यांत आली आहे. आतापर्यंत ज्या मालकांचें उत्पन्न महिना २०० रु. पेक्षा अधिक नसेल त्यांच्या मालकीच्या गुरांनाच मोफत औषधोपचाराचा फायदा मिळत असे.

**मुंबई बंदराची सुधारणा** —मुंबईमधील बोटी नांगरण्याच्या गोद्यांचें आधुनिकीकरण करण्याची योजना आंखण्यांत आली आहे. ह्या कामासाठी ११ कोटी रुपये खर्च येईल. योजना आंखण्याच्या कामांत रॉटरडॅममधील एका तज्ज्ञाचें साह्य घेण्यांत आले आहे. योजना पूर्ण झाली म्हणजे बंदराच्या उत्पन्नांत वाढ होईल. भारत सरकारच्या मंजुरीसाठी ती धाडण्यांत आली आहे.

**महाराष्ट्रांत सिमेंटचा मोठा कारखाना** — यवतमाळ जिल्ह्यांत राजूर ह्या ठिकाणीं सिमेंटचा एक मोठा कारखाना उभारण्यांत येणार आहे. कारखाना खाजगी मालकीचा असेल आणि त्यांत दरसाल १० लाख टन सिमेंट तयार करूं शकणारी यंत्रसामग्री बसविण्यांत येईल. कारखान्याच्या उभारणीच्या कामांत जर्मनीचें साह्य मिळणार आहे. सुरुवातीला ह्या कारखान्यांत दरसाल २,५०,००० टन सिमेंट तयार करण्यांत येईल. कारखान्यांत १,००० लोकांना रोजगार मिळेल व त्याच्या उभारणीसाठी २ कोटी रुपये भांडवल लागेल. त्यांपैकीं १·२ कोटी रुपये यंत्रसामग्रीसाठीं लागतील. ६० लाख रुपये किंमतीची यंत्रसामग्री आयात करण्यांत येणार असून बाकीची जर्मन तंत्रज्ञांच्या साह्यानें भारतांतच तयार करण्यांत येईल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनी छापिलें व
' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.